**पद्यपाठ ११**

**निष्ठा**

**ठळक मुद्दे**

- **कवितेचे नाव-** निष्ठा
- **कवी** प्रदीप पाटील
- **कवितेचा प्रकार-**गद्यकाव्य
- **कवितेचा आशय-**मातीवर निष्ठा असणारा शेतकरी बाप-त्याचे वर्णन करताना माणुसकी नष्ट होत चालल्याबद्दल कवीने व्यक्त केलेली खंत.
- **कवितेचे भाष्य व विचार सौंदर्य-**शब्दनिवड,अनेक अर्थाच्या शक्यता असलेली रचना.
- **पूरक वाचनासाठी कविता-**वाचन,साम्यभेद शोधन
- **उपक्रम-**कवितेचे प्रकटवाचन,बातम्या /लेख /कविता संकलन,निबंधलेखन

## प्रस्तावना:

मातीवर निष्ठा असणाऱ्या शेतकरी बापाचे वर्णन कवीने या कवितेत केले आहे. कविता वाचताना व ऐकताना कवीच्या शेतकरी बापाचे वर्णन तुमच्या मनात उभे राहते का ते पहा.

## निष्ठा

**वारकऱ्याचा नेम चुकंल वारीचा**

**पण माझ्या बापाचा नेम चुकत नाही**

**रानात जायचा**

**गाव पहाटेचं स्वप्नात असतं**

**तेव्हा बाप असतो रानात**

**व्यवहारी जगातल्या प्रश्नांपासून**

**आटिंग्यावनासारखा तो शेकडो मैल दूर**

**'उगवतं ते माझं आणि**

**सापडतं ते दुसऱ्याचं' अशी त्याची नीती**

**जगणं मातीमोल व्हायची वेळ आली तरी**

**कधीच कमी झाली नाही**

**त्याची मातीवरची निष्ठा**

**परिस्थितीला रेड्यासारखी टक्कर द्यायचं बळ**

**मातीनंच दिलं असावं त्याला**

**'पेरायला  आणि दारं मोडायला आलं की**

**सगळं बैजवार होतं' अशी त्याची शिकवण**

**मी रानाबरोबर माणसं पेरायला शिकलो**

**आता रानात पीक मावता मावत नाही**

**पण माणुसकी मात्र**

**उगवता उगवत नाही.**

## Template 2

### कवितेतील आशय

कवी म्हणतात माझा बाप रोज पहाटेच न चुकता शेतात जातो. एकवेळ वारकऱ्यांचा वारीला जाण्याचा नेम चुकेल पण त्याचा शेतात जायचा नेम चुकणार नाही. एखादं जंगल जसं माणसाच्या वस्तीपासून दूर असतं तसं व्यवहारातल्या प्रश्नांपासून तो दूर असतो. 'माझ्या शेतात जे उगवतं तेवढ माझं आणि ज्याला जे सापडेल ते त्याच' अशी त्याची नीती आहे. व्यवहाराकडे दुर्लक्ष केल्यामुळे कितीही नुकसान झालं तरी त्याची मातीवरची निष्ठा कमी होत नाही. परिस्थिती कितीही कठीण असली तरी तो तिला एखाद्या रेड्यासारखी टक्कर देऊ शकतो. त्यासाठीचं बळही त्याला मातीकडूनच मिळत असत. मातीत बी पेरायला आणि दारं सोडून पाणी योग्य दिशेने वळवायला आलं की सगळ व्यवस्थित होतं असं तो आम्हाला शिकवायचा. आम्ही 'माणसं पेटवायला' शिकलो. माणसाचं वारेमाप पीक उगवलं पण माणुसकी मात्र उगवत नाही. (माणुसकीनं वागणारी माणसं तयार होत नाहीत).

### कवितेतील विचार सौंदर्य

या कवितेची शब्दरचना आपण नेहमी बोलतो तशीच आहे. मात्र कमीतकमी शब्दात मोठा आशय सूचित करणारी अनेक वाक्ये आहेत. अशा प्रकारच्या रचनेला 'गद्यकाव्य' असे म्हणतात.या कवितेत आलेली पुढील वाक्ये लक्षपूर्वक वाच.

१)  'उगवत ते माझं आणि सापडतं ते दुसऱ्याचं'

२) ‘जगणं मातीमोल झालं तरी त्याची मातीवरची निष्ठा कमी झाली नाही ’

३) ‘ परिस्थितीला रेड्यासारखी टक्कर दयायचं बळ त्याला मातीकडूनचं मिळालं असाव ’

४) ‘ पेरायला आणि दारं मोडायला आलं की सगळ बैजवार होतं ’

५) ‘ मी रानाबरोबर माणसं पेरायला शिकलो’

६) ‘ आता रानात पीक मावता मावत नाही आणि ’
‘ माणुसकी मात्र उगवता उगवत नाही ’
या ओळींचे कोणते वैशिष्ट्य तुला प्रकर्षाने जाणवते?

**उजळणी प्रश्न**

प्रश्न-१ संदर्भासह स्पष्टीकरण करा.

१) जगणं मातीमोल व्हायची वेळ आली तरी

कधीच कमी झाली नाही

त्याची मातीवरची निष्ठा

२) मी रानाबरोबर माणसं पेरायला शिकलो

प्रश्न-२ पुढील ओळींमधील उपमेय व उपमान ओळखून लिहा अलंकार कोणता ते लिहा

१) आटिंग्यावनासारखा तो शेकडो मैल दूर

२) परिस्थितीला रेड्यासारखी टक्कर द्यायचं बळ

प्रश्न-३ पुढील ओळींमधे आलेली अव्यये ओळखून लिहा व त्यांचे प्रकार लिहा.

१) व्यवहारी जगातल्या प्रश्नांपासून

आटिंग्यावनासारखा तो शेकडो मैल दूर

२) कधीच कमी झाला नाही

त्याची मातीवरची निष्ठा

**मुक्त प्रश्न:**

१)कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचे जगणे 'मातीमोल' होण्याची वेळ का येते असे तुला वाटते ?

२)' **माणुसकी उगवता उगवत नाही**' या ओळीतून कवीला काय सूचवायचे आहे ? कवीच्या या मताशी तू सहमत आहेस का? तुझ्या म्हणण्याचे समर्थन कर.

३)पुढे दिलेली कवी सुरेश शिंदे यांची '**शिकवण**' ही कविता वाच.या कवितेतील बाप आणि निष्ठा कवितेतील बाप या दोघांमधे कोणते साम्य आहे?

**शिकवण**

सुरेश शिंदे

बाप सांगायचा

आम्ही लिव्हलं मातीवर

तू कागदावर लिही

पण ध्यानात ठेव पोरा !

पिकत नसतो कागद

भाकर देते भुई

४)शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी काय करायला हवे ?या विषयावरील बातम्या,लेख,कविता मिळवा.वाचा.त्यानंतर 'शेतकऱ्यांची परिस्थिती-दशा आणि दिशा' या विषयावर २० ते २५ ओळीचा निबंध लिहा.